प्रसिध्दी पत्रक **दिनांक 23/12/2025**

ईलोसे आरोपी :- 1) श्रीमती ज्योती इंदर शेजुळ, वय 38 वर्षे, धंदा - नोकरी, समुपदेशक (कंत्राटी) महिला समुपदेश कार्यालय पैठण, रा. नवीन कावसार पैठण ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर 2) श्रीमती विजया यादव भंडारे, वय 52 वर्षे, धंदा - नोकरी, (कंत्राटी) समुपदेश कार्यालय पैठण, रा. भीमनगर, भावसिंगपुरा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडुन 8,000/- (आठ हजार रुपये) लाच स्विकारल्याने आरोपी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग	छत्रपती संभाजीनगर
गुन्हा दाखल पोलीस ठाणे	पोलीस ठाणे पैठणं, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.
आरोपी यांचे नाव व पत्ता	**ईलोसे आरोपी** 1) श्रीमती ज्योती इंदर शेजुळ, वय 38 वर्षे, धंदा - नोकरी, (कंत्राटी) महिला समुपदेश कार्यालय पैठण, रा. नवीन कावसार पैठण ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर 2) श्रीमती विजया यादव भंडारे, वय 52 वर्षे, धंदा - नोकरी, (कंत्राटी) महिला समुपदेश कार्यालय पैठण, रा. भीमनगर, भावसिंगपुरा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर
लाच मागणी रक्कम	10,000/- (दहा हजार रुपये)
लाच स्विकृती रक्कम	8,000/- (आठ हजार रुपये)
सापळा अधिकारी	श्री. संतोष तिगोटे, पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
तपास अधिकारी	श्री. राजु नागलोत, पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
लाच मागण्याचा हेतु	तक्रारदार यांच्या मुलाचा लग्न झाल्यानंतर तक्रारदार यांच्या मुलाची पत्नी नामे भक्ती अशोक अंधारे ही दोन महिने नांदायला होती. त्यानंतर ती भांडण करुन तिच्या माहेरी निघुन गेली होती व तिने महिला समुपदेशन कार्यालय पैठण येथे दिनांक 12/08/2023 रोजी तक्रारदार व तक्रारदार यांच्या मुली शारीरीक व मानसिक छळ करतताात अशी तक्रार दिली होती. आरोपी क्रमांक 1, 2 यांनी दिनांक 28/11/2025 रोजी तुमचे प्रकरण मिटवुन टाकु परंतु त्यासाठी तुम्हाला 10,000/- (दहा हजार रुपये) लाचेची मागणी केली.
थोडक्यात माहिती	तक्रारदार यांच्या मुलाचा सन 2023 मध्ये लग्न झाल्यानंतर तक्रारदार यांच्या मुलाची पत्नी नामे भक्ती अशोक अंधारे ही दोन महिने नांदायला होती. त्यानंतर ती भांडण करुन तिच्या माहेरी निघुन गेली होती व तिने महिला समुपदेशन कार्यालय पैठण येथे दिनांक 12/08/2023 रोजी तक्रारदार व तक्रारदार यांच्या मुली यांच्या विरुध्द शारीरीक व मानसिक छळ करतताात अशी तक्रार दिली होती. सदर प्रकरणात सुनावण्या सुरु आहे तक्रारदार या नियमित तारखेवर जात होत्या दिनांक 28/11/2025 रोजी तक्रारदार हे आरोपी क्रमांक 1, 2 यांच्याकडके गेले असता त्यांनी पुढच्या तारखेत तुमचे प्रकरण मिटुन टाकु परंतु त्यासाठी तुम्हाला आम्हाला 10,000/- (दहा हजार रुपये) स्वत:साठी लाच मागणी केली. दिनांक 23/12/2025 रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची शासकीय पंच समक्ष लाच मागणी कार्यवाही आजमावली असता इलोसे क्रमांक 1) व 2) यांनी तक्रारदार यांनी दिलेल्या अर्जा संबंधित प्रकरण मिटुन देण्यासाठी तक्रारदाराचे यांच्याकडे 10,000/- (दहा हजार रुपये) रुपये लाचेची मागणी केली होती. परंतु तक्रारदार यांच्याकडुन 8,000/- (आठ हजार रुपये) रुपयांची पुर्तता झाल्याने तडजोडी अंती 8,000/- (आठ हजार रुपये) सदरची रक्कम ईलोसे यांनी स्वत: स्वीकारली. सदर वेळी ईलोसे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. ईलोसे यांचे विरुध्द पोलीस ठाणे पैठण, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असुन नमुद गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मार्फत करण्यात येत आहे.

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधिक्षक श्री राजीव तळेकर, यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी संतोष तिगोटे, पोलीस निरिक्षक, यांनी केली आहे. तसेच तपासीक अधिकारी श्री राजु नागलोत पो.नि. सदर तपास करित असुन त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/ साईनाथ तोडकर, सिनकर म.पो.ह./ पुष्पा दराडे, चापोअ/ रामेश्वर ताठे ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता	:- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल	:-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in
	2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन	:- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक	:- 90110 92777
अपर पोलीस अधीक्षक	:- 9923102205
पोलीस उप अधीक्षक	:- 9823498777